# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक 21.09.2012 (का.प.क्र.13) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>**

शुक्रवार दिनांक 21.09.2012 (का.प.क्र.13) रोजी मा.सभापती श्री.विकास रतनलाल जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.30 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.प्र.आयुक्त तथा उपआयुक्त (प्रशासन) श्री.रविंद्र निकम, प्र.नगर सचिव तथा विधी सल्लागार श्री.ओ.सी.शिरसाठ यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
02. स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
03. स. श्री.आगा खान मिया खान
04. स. श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
05. स. श्रीमती राजपुत प्राजक्ता विश्वनाथ
06. स. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
07. स. श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
08. स. श्री. खान अक्रम करीम खान
09. स. श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
10. स. श्री.समीर सुभाष राजुरकर

मा.सभापती :5 मिनीटांसाठी सभा तहकूब करण्यात येते.
(11.35 वा.सभा सुरू)

श्री.नारायण कुचे :मुंकूदवाडी येथील विहीरीचा गाळ काढत असतांना तीन लोकांचा मृत्यु झालेला आहे. एजन्सीला काम देण्यात आले होते त्या ठिकाणी प्रशासनाचे अधिकारी उपस्थित होते का? मी त्या ठिकाणी उपस्थित असतांना त्या ठिकाणी प्रशासनाचे कुणीही अधिकारी/कर्मचारी उपस्थित नव्हते. सदरील अपघात हा महानगरपालिकेच्या निष्काळजीपणामुळे झालेला आहे. संबधीत उपअभियंता, अभियंता यांचेवर गुन्हा दाखल करण्यात यावा. प्रशासनातर्फे जी मदत जाहिर झालेली आहे त्यामध्ये आणखी मदत वाढविण्यात यावी. दोषी अधिकाऱ्यांविरूध्द जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी.

श्री.समीर राजुरकर :एखाद्या विहीरीची सफाई किंवा कामाचे टेंडर करतो तेव्हा तीथे घडणाऱ्या घटनांमध्ये जबाबदारी ही कंत्राटदाराची असते का खुलासा करण्यात यावा? सहानुभूतिपूर्वक विचार म्हणुन महानगरपालिकेने विचार केलेला आहे. या घटनेनंतर गांभिर्याने पाहिले पाहिजे.

कंत्राटदाराने सदरील मजूरांचा विमा उतरविलेला आहे आहे का व इतर सर्व बाबी मनपाने तपासायला पाहिजे.

श्री.विजेंद्र जाधव :अभियंता यांनी संबधीत ठिकाणाची तपासणी केली नव्हती का? सेफ्टी यंत्रणा मजूरांना पुरविण्यात न आल्यामुळे तीन व्यक्तींचा मृत्यु झ ाला आहे. अभियंता आणि उपअभियंता यांचेवर कठोर कार्यवाही झ ाली पाहिजे.

श्री.बाळासाहेब मुंडे :प्रत्येक वेळेस गणेश उत्सव येतो व विहीरी साफ केल्या जातात. विहीरी मध्ये गाळ जमा झाल्यामुळे गॅस निर्माण झाला याबाबींची अभियंता यांनी तपासणी करणे आवश्यक होते. याबाबीची शहानिशा केली असतीतर ही घटना घडली नसती. प्रत्यक्ष स्थळी अधिकारी हजर असने आवश्यक आहे. सदरील घडलेल्या घटनेबाबत संबधीतांवर गुन्हे दाखल करण्यात यावे.

श्री.रेणुकादास वैद्य :संबधीत अधिकारी व कंत्राटदार यांचेवर कारवाई करण्यात यावी.

मा.सभापती :गणेश उत्सवाच्या सुरवातीस ही दुर्घटना घडली आहे. सकाळपासून सर्व अधिकारी पदाधिकारी स.सदस्य घडलेल्या ठिकाणी उपस्थित होते. प्रशासनाने योग्य लक्ष देणे आवश्यक आहे. दिवसेंदिवस गणेश मंडळ वाढत आहे. प्रशासनाने आजपासून येणाऱ्या गणेश उत्सवाची तयारी करण्यात यावी. प्रशासनाने आजपासून उपअभियंता यांनी त्यांच्या भागात योग्य नियोजन करून काम सुरूवात करण्यात यावी. अशा प्रकारची घटना भविष्यात घडणार नाही याची काळजी घेण्यात यावी. सन 1990 रोजी अशा प्रकारचा विषय घडलेला आहे. सदर विहीरीवर प्रत्यक्ष भेट दिल्यावर विहीरीतील विषारी गॅसचा प्रचंड वास येत होता अशा परिस्थितीत ते मजूर काम करत होते. कंत्राटदार संबधीत ठिकाणी हजर होता किंवा नाही. याबाबत कडक चौकशी करण्यात यावी. जे दोषी असतील त्यांचेवर कारवाई करण्यात यावी. येणाऱ्या स्थायी समितीमध्ये चौकशी अहवाल सादर करण्यात यावी.

श्री.नारायण कुचे :विहीरीतील गाळामध्ये एक मजूर फसत असतांना दोन मजूर त्यास बाजीवरून वाचविण्यासाठी गेले असता तेही त्या गाळामध्ये फसुन तडफडुन मृत्यु झाला. त्या ठिकाणी मनपाचे व संबधीत कंत्राटदार व इतर कुणीही उपस्थित नव्हते. मा.आयुक्तांनी सदर विहीरीची पहाणी 15 दिवसांपुर्वी केली असता मा.आयुक्तांनी तातडीने सदर विहीरीची सफाई करण्याचे आदेश दिले होते. साईडवर थांबण्याची जबाबदारी अभियंत्याची आहे.संबधीतांवर तातडीने गुन्हे दाखल झाले पाहिजे.

मा.सभापती :याबाबतीत प्रशासन काय करणार याबाबतीत खुलासा करण्यात यावा.

शहर अभियंता :घडलेली घटना वाईट घडलेली आहे. यांत्रिकी विभागाकडुन ज्या निविदा काढल्या जातात व जे कामकाज चालते ते महाराष्ट्र शासनाने ठरवुन दिलेल्या अटी शर्ती व नियमानुसार कामकाज चालते. त्याच धर्तीवर संबधीत गुत्तेदाराला काम देण्यात आले होते. संबधीत ठिकाणी

लागणारे साहित्य सेफ्टी यंत्रणा याबाबत सर्वस्वी संबधीत गुत्तेदार जबाबदार असतो. लेबरसाठी आवश्यक ते सेफ्टी साहित्य त्या ठिकाणी उपलब्ध नव्हते. त्यामुळे यास गुत्तेदार जबाबदार आहे. त्यांचेवर एफआयआर दाखल झालेला आहे. संबधीत उपअभियंता यांना निलंबीत करण्यात आलेले आहे.

मा.सभापती :पुढील स्थायी समितीमध्ये प्रशासनाने अहवाल सादर करावा.

श्री.नारायण कुचे :संघर्षनगर येथील विहीरीमध्ये गणेश विसर्जनाची व्यवस्था करण्याची सोय करण्यात यावी.

मा.सभापती :प्रशासनाने याबाबत सर्व ती पुर्वतयारी करण्यात यावी.

श्री.समीर राजुरकर :प्रशासनाने आगामी गणेश उत्सवासाठी यावर्षीपासुनच नियोजन करण्यात यावे. विहीरीचे स्पॉट शोधुन त्यासंबधी कार्यवाही करण्यात यावी.

मा.सभापती :एरियावाईझ स्पॉट शोधण्यात यावे पेपरमध्ये जाहिर प्रगटन देण्यात यावे. गणेश उत्सव समिती आणि प्रशासनाने मिळुन नियोजन करण्यात यावे. जी घटना घडलेली आहे ती अत्यंत गरीब कुटूंबातील व्यक्ती आहे त्याना तीन लाख रूपये आर्थिक मदत केल्याबाबत प्रशासनाचे पदाधिकारी यांचे धन्यवाद करण्यात येते.

श्री.समीर राजुरकर :चिकलठाणा येथील अतिक्रमणचा विषय गेल्या तीन ते चार बैठकांमध्ये मांडत आहे. त्या सभांचे इतिवृत्त अद्यापर्यंत तयार करण्यात आलेले नाही. सभेमध्ये मांडण्यात आलेले नाही. नगर सचिव विभागाने किती सक्षमपणे काम केले पाहीजे आज ही 13 वी बैठक आहे एकाही बैठकीचे इतिवृत्त प्राप्त झालेले नाही. यानंतर इतिवृत्त न मिळाल्यास बैठकीस उपस्थित राहणार नाही.

मा.सभापती :जाणुन बुजून प्रशासन इतिवृत्त देत नाही. शासनाकडे या संदर्भात तक्रार करण्यात येईल. इतिवृत्त न देण्याचे कारण काय खुलासा करण्यात यावा.

श्री.समीर राजुरकर :इतिवृत्त सभेत मांडण्याच्या ॲक्टनुसार इतिवृत्त प्राप्त झाले पाहिजे.

प्र.नगर सचिव तथा वि.स.:मागील सभेचे इतिवृत्त पुढील मिटींगपर्यंत देणे कायद्याने बंधनकारक आहे. स.सदस्यांच्या म्हणण्यानुसार मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त अद्यापपर्यंतही मिळालेले नाही. स.सदस्य श्री.समीर राजुरकर यांना उपआयुक्त प्रशासन तथा नगर सचिव यांच्याकडुन दिनांक 18.09.2012 रोजी पत्राद्वारे कळविण्यांत आलेले आहे की, 19.07.2012 पर्यंत संपन्न झालेल्या सभांचे इतिवृत्त मा.सभापती, स्थायी समिती यांचे अवलोकनार्थ पाठविण्यात आलेले आहे. पुढील सभेचे इतिवृत्त तयार करण्याचे काम चालू आहे.

श्री.समीर राजुरकर :इतिवृत्त मिळणे हा स.सदस्यांचा अधिकार असतांना स्थायी समितीचे इतिवृत्त प्रलंबित का ठेवले जातात. 13 इतिवृत्त पुर्ण करून का पाठविण्यात आले नाही.

**मा.सभापती** :मा.आयुक्तांना या संदर्भात पत्र देण्यात यावे. पुढील सभेपर्यंत 13 इतिवृत्त देण्यात यावे. नगर सचिव विभागात स्टेनो/ कर्मचारी नाही. प्रभारी चार्ज कर्मचाऱ्याकडे देण्यात आलेला आहे त्याना स्टेनोचा चार्ज देण्याची, याबाबतची जबाबदारी प्रशासनाची आहे.

**श्री.समीर राजुरकर** :इतिवृत्तामध्ये एखादी ओळ किंवा चर्चा वगळण्यात आल्यास याची जबाबदारी कुणाची याबाबत मा.न्यायालयात दाद मागावी लागेल.

**मा.सभापती** :प्रशासनावर गंभिर आरोप होत आहे. याबाबतीत प्रशासनाने गंभिर राहिले पाहीजे. स.सदस्यांचा नागरीकांचा हा अधिकार आहे.

**श्री.समीर राजुरकर** :एका विशिष्ट माणसाने त्याचे विरोधात स्थायी समितीमध्ये पाच वेळेस चर्चा झाली त्याने पत्र दिले कि, इतिवृत्त पाहिजे, त्यावर नगर सचिव, मा.सभापती यांची स्वाक्षरी नसतांना झेरॉक्स कॉपी संबधीतास देण्यात आलेली आहे. सदरील कॉपी कदाचित येत्या आठ दिवसात मा.न्यायालयात सादर करणार आहे. सभागृहातील स.सदस्यांना कॉपी मिळत नाही परंतु त्या विशिष्ट व्यक्तीच्या घरी जावुन कॉपी देण्यात येत आहे.

**प्र.आयुक्त तथा (उपआयुक्त(प्र)):** स्थायी समितीचे सहा बैठकांचे इतिवृत्त तयार आहेत. मा.सभापती स्थायी समिती यांचे स्विय सहाय्यक यांचेकडे देण्यात आलेले आहेत.

**श्री.समीर राजुरकर** :मा.सभापती यांना दुरध्वनीवरून का सांगण्यात आले नाही.

**मा.सभापती** :आरोप माझ्यावर होत आहे. प्रशासनाने खुलासा करावा.

**प्र.आयुक्त तथा (उपआयुक्त(प्र)):** मा.सभापती यांचे हातात इतिवृत्ताच्या कॉपी दिलेल्या नसुन त्यांचे पी.ए.कडे कॉपी दिलेल्या आहेत तसेच उर्वरीत सहा इतिवृत्त पुढील बैठकीत देण्यात येतील.

**मा.सभापती** :सहा इतिवृत्त तयार झाले असतील तर ते स.सदस्यांना का देण्यात आले नाही.

**प्र.आयुक्त तथा (उपआयुक्त(प्र)):** इतिवृत्ताचे झेरॉक्स काढण्यासाठी पेपर उपलब्ध नाही.

**मा.सभापती** :इतिवृत्ताच्या कॉपी काढण्यासाठी पेपर नाही ही प्रशासनाची दुर्देवीबाब आहे.

**श्री.समीर राजुरकर** :इतिवृत्त अवलोकनार्थ पाठविलेले आहे म्हणुन मा.सभापती यांना दुरध्वनी करणे आवश्यक होते.

**श्री.बाळासाहेब मुंडे** : पेपर नाही ही दुर्देवी बाब आहे. सदरील उत्तर योग्य नाही.

**श्री.समीर राजुरकर** :इतिवृत्तामध्ये काही बदल करावयाचा असल्यामुळे इतिवृत्त दिले जात नाही.

**मा.सभापती** :येणाऱ्या बैठकीपर्यंत सर्व इतिवृत्त देण्यात यावे तसेच प्रशासनाची काय अडचण आहे त्याबाबतीत खुलासा करण्यात यावा.

**प्र.नगर सचिव तथा वि.स.:** इवृित्ताचे कामकाज नगर सचिव विभागामार्फत करण्यात येते. सदरील चार्ज हा फक्त मिटींगपुरता असल्याने उपआयुक्त प्रशासन चांगल्या प्रकारे खुलासा करू शकतात.

मा.सभापती :स.सदस्य श्री.समीर राजुरकर यांनी मांडलेल्या मुद्यानुसार कुठल्या प्रकरणात स्टे आहे खुलासा करण्यात यावा.

विधी सल्लागार :चिकलठाणा प्रकरणात महापालिकेतर्फे जबाब दाखल केलेला आहे. मागील बैठकीत ॲडिशनल पंचनामा सादर करण्यास सांगण्यात आले होते. त्यानुसार पंचनामाही सादर करण्यात आलेला आहे. प्रकरण अर्ग्युमेंटसाठी ठेवण्यात आलेले आहे. अर्ग्युमेंट झाल्यानंतर निर्णय सभागृहास अवगत करण्यात येईल.

श्री.समीर राजुरकर :पोल्ट्रीफॉमसाठी परवानगी होती पोल्ट्रीफॉमचे स्ट्रक्चर होते असे मा.न्यायालयाच्या निदर्शनास आणुन दिलेले आहे का?

विधी सल्लागार :विशेषत: सदरील मुद्याबाबत कागदपत्र उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

मा.सभापती :याबाबतीत दालनात बैठक लावुन याबाबतीच चर्चा करण्यात येईल.

श्री.समीर राजुरकर :नगरसचिव विभागास स्टेनो कर्मचारी देण्यात आलेला आहे का? चार बैठकांपासून नगरसचिव विभागातील कर्मचारी, स्टेनोबाबत चर्चा चालू आहे.

प्र.नगर सचिव तथा वि.स.:याविषयी माहीती घेवुन माहीती सादर करण्यात येईल.

प्र.आयुक्त तथा (उपआयुक्त(प्र)):नगर सचिव विभागास एकच स्टेनो कार्यरत असुन श्री.नवले यांचेकडे मा.सर्वसाधारण सभेचे कामकाज देण्यात आलेले आहे. तसेच नगर सचिव विभागामध्ये श्री.मनोज मारवाडे यांचेकडे स्टेनोची जबाबदारी दिलेली आहे स्टेनोची मागणी केलेली आहे परंतु अद्यापर्यंत स्टेनो आलेला नाही. सध्या अतिरिक्त कार्यभार संभाळत असलेल्या कर्मचाऱ्यास फुलटाईम स्टेनोचेच पदनाम देवुन काम देण्यात यावे जेणेकरून इतिवृत्त तयार होण्यास विलंब होणार नाही.

मा.सभापती :वारंवार स्टेनोचा विषय सभागृहात चर्चीला जात आहे. स्थायी समिती ही महानगरपालिकेची अतिशय महत्वाची सभा असुन आर्थिकबाबींशी व शहर विकासासंदर्भात प्रश्न, चर्चा करण्यात येते त्या सभेस स्टेनो नाही ही बाब गंभीर आहे. प्रशासन का निर्णय घेत नाही. सदरील कर्मचाऱ्यास फुलटाईम चार्ज देण्याकरीता मा.आयुक्तांशी का चर्चा केली जात नाही. प्रशासनास आदेशित करण्यात येते की, यासंबधी मा.आयुक्तांशी प्रत्यक्ष चर्चा करून प्रश्न तातडीने मार्गी लावण्यात यावे. शहरात किती अतिक्रमण चालू आहे तसेच सभेमध्ये वारंवार झालेल्या चर्चेनुसार अतिक्रमणाबाबत खुलासा करण्यात यावा.

प्रशासकीय अधिकारी :सेव्हन हिल येथील बाधंकामाबाबत मा.न्यायालयाचा स्टे आहे.

श्री.नारायण कुचे :जास्तीचे बांधकाम पाडण्यात यावे म्हणुन सभेने आदेशित केले होत माहीती देण्यात यावे,

प्रशासकीय अधिकारी :स्थगीती दिल्यानंतर बांधकाम झालेले नाही.

श्री.नारायण कुचे :परवानगी रद्द झाल्यानंतरही बांधकाम चालू होते.

मा.सभापती :बीड बायपासबाबत खुलासा करण्यात यावा.

प्रशासकीय अधिकारी :कॅवेट दाखल करण्यात आले होते. परंतु मा.न्यायालयाने स्थगीती आदेश दिलेला आहे.

श्री.नारायण कुचे :पुंडलीक नगर येथे मनपाच्या ओपनस्पेनमध्ये 30 ते 40 गाळे बांधण्यात आले. श्री.झनझन यांना याबाबतची माहिती देण्यात आली होती.

प्रशासकीय अधिकारी :याबाबत विधी विभागाकडे अभिप्रायसाठी पाठविण्यात आले होते. याबाबतची माहीती घेवुन सभेसमारे सादर करण्यात येईल.

श्री.रेणुकादास वैद्य :बांधकामास सपोर्ट करण्यासाठी आहे का की, तोडण्यासाठी आहात खुलासा करण्यात यावा.

प्रशासकीय अधिकारी :वकीलांकडुन मुळ संचिका मिळाल्यानंतरच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री.रेणुकादास वैद्य :स.सदस्या श्रीमती छायाताई वेताळ यांनी शिवाजी नगर भागातील अतिक्रमणाबाबत तक्रार केलेली आहे. सर्व हातगाडया रस्त्यावर उभ्या राहातात. गंभीर अपघात घडलेला आहे. स्त्रीयांची छेडछाड केली जातात.

प्रशासकीय अधिकारी :शिवाजी नगर भागात वेळोवेळी अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करण्यात येते.

श्री.गिरजाराम हाळनोर :शहानुरवाडी चौकामध्ये नविन चौपाटी तयार होत आहे. त्या ठिकाणीही अतिक्रमणाचा विळाखा पडलेला आहे. अशा अतिक्रमणास पांठींबा आहे का?

मा.सभापती :शहरामध्ये एकुण किती अतिक्रमण चालू आहे. माहिती देण्यात यावी.

प्रशासकीय अधिकारी :याबाबतची माहीती घेवुन माहिती सादर करण्यात येईल.

मा.सभापती :कंम्पाऊंड वॉलचे अतिक्रमणाची तक्रार स.सदस्य श्री.चौधरी यांनी दिली परंतु कोर्टात जाण्याची संधी दिली जाते.

प्रशासकीय अधिकारी :मा.आयुक्तांच्या आदेशानुसार सहाय्यक संचालक नगर रचना यांचेकडुन पुर्ण खात्री करुन पुढील कार्यवाही करण्यात यावी. गुंठेवारीची रक्कम भरल्याच्या पावत्या सादर करण्यात आलेल्या आहेत. सहाय्यक संचालक नगर रचना यांचेकडुन पुर्ण माहीती घेवुन पुढील कार्यवाही करावी लागेल.

मा.सभापती :हॉलीडे कॅम्पच्या समोरील अतिक्रमणाबाबत माहिती देण्यात यावी.

प्रशासकीय अधिकारी :बांधकाम तोडण्यासंबधी संचिका पुटअप करण्यात आली होती. मा.आयुक्तांकडे संबधीत व्यक्तीने तक्रार अर्ज सादर केलेला आहे सदरील तक्रार अर्ज सहा.संचालक नगर रचना आणि विधी सल्लागार यांचेकडे चौकशी करण्यासाठी आदेशित केलेले आहे.

सहा.संचालक न.र. :त्या ठिकाणी कुठल्याही प्रकारची बांधकाम परवानगी दिलेली नाही.

प्रशासकीय अधिकारी :अहवाल प्राप्त झाल्यानंतर कारवाई करण्यात येईल.

शहर अभियंता :अहवाल मा.आयुक्तांकडे सादर केलेला आहे.

मा.सभापती :शहरात चालु असलेल्या एकुण अतिक्रमणाबाबत माहिती देण्यात यावी.

**श्री.गिरजाराम हाळनोर** :बांधकाम परवानगी घेतांना कंम्पाऊड वॉलची परवानगी घ्यावी लागते का?

**सहा.संचालक न.र.** :बांधकाम नकाशामध्ये आतील कंम्पाऊड वॉलसह पानवगी मागीतली असेलतर ती देण्यात येते. प्लॉटला संरक्षित करायचे असेल तर नुसते कंम्पाऊड वॉलची परवानगी घेतली जाते.

**श्री.समीर राजूरकर** :उत्सव काळात ज्या दुकाना लागल्या जातात त्याचे रिव्हेन्यु महानगरपालिकेत जमा होतो का? 4 ते 5 हजार दुकाना लागल्या जातात.

**मा.सभापती** :याबाबत प्रशासनाचे कुठलेही नियाजन आढळुन येत नाही. दुकानदार स्थायी होण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे मनपाची कोंडी निर्माण होते. तात्पुरत्या शेडची परवानगी वार्ड इंजिनियरला परवानगी देण्यासंबधी आदेशित करण्यात यावे.

**सहा.संचालक न.र.** :मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे 9 मिटर ते 45 मिटरमध्ये वाहतुकीला अडथळा निर्माण होईल अशा स्ट्रक्चरला तात्पुरतीही परवानगी नाही.

**श्री.समीर राजुरकर** :हक्काची जागा समजुन दरवर्षी दुकान टाकले जाईल त्यामुळे प्रशासनाने जाहिर प्रगटन देवुन रिव्हेन्युबाबत, नियमाबाबत माहिती देण्यात यावी.

**मा.सभापती** :प्रशासनाने नियोजन करून निर्णय घेण्यात यावे.

**श्री.गिरजाराम हाळनोर** :इतर ठिकाणीही कोर्टाचा आदेश आहे. दंडास्वरूपात रिव्हेन्यु जमा केल्या जातात.

**मा.सभापती** :मा.उच्च न्यायालयाला याबाबतीत विनंती करण्यात यावी. सेव्हनहिल उड्डाणपुलावरील लाईटबाबत खुलासा करण्यात यावा.

**कार्य.अभियंता (विद्युत)** :पायलेट प्रोजेक्टचे तीन पोल लावण्यात आलेले आहे. एकदा स.पदाधिकारी यांनी पहाणी करून अंतिम निर्णय घेण्यात यावा.

**श्री.गिरजाराम हाळनोर** :अमरप्रीत रोडवरील लाईटबाबत खुलासा करण्यात यावा.

**कार्य.अभियंता (विद्युत)** :काम लवकर सुरू करण्यात येणार आहे.

**श्री.रेणुकादास वैद्य** :धन्वंतरी नगर भागातील विद्युत दिवे अनेक दिवसांपासून बंद अवस्थेत आहे. अनेकदा पाठपुरावा केलेला आहे. पंरतु प्रश्न प्रलंबित आहे.

**मा.सभापती** :तात्काळ विद्युत दिवे सुरू करण्यात यावे.

**श्री.रेणुकादास वैद्य** :गणेश विसर्जना दरम्यान रस्त्यावर खड्डे आहेत सदरील खड्डयांचे पॅचवर्क करण्यात यावे नसता गणेश विसर्जनाची मिरवणुक महापालिकेत आणावी लागेल.

**श्री.समीर राजुरकर** :मागील बैठकीत निर्णय झालेला आहे की, किमान गणेश विर्सजनाच्या मार्गावरील खड्डे पॅचवर्क करण्यात यावे.

**मा.सभापती** :खुलासा करण्यात यावा.

**शहर अभियंता** :सहा वार्डामध्ये पॅचवर्कचे टेंडर काढण्यात आले होते. तीन दिवसांची मुदत देण्यात आली परंतु टेंडर आले नाही पुन्हा दोन दिवसांची मुदत

देण्यात आली त्यानंतर दोन निवीदा तीन वार्डासाठी दाखल झालेला आहे.उर्वरीत तीन वार्डासाठी निवीदा प्राप्त झालेल्या नाहीत.

**श्री.रेणुकादास वैद्य** :ज्या वार्डासाठी निवीदा प्राप्त झालेल्या नाहीत त्यामध्ये मा.आयुक्तांच्या विशेष अधिकार वापरून काम करण्यात यावे.

**शहर अभियंता** :काम सुरू करण्यास दोन ते तीन दिवसांचा अवधी लागणार आहे. मा.आयुक्तांकडे काम करण्यासाठी शिफारस करण्यात येईल. कलमांचा वापर करण्यात येईल.

**मा.सभापती** :पॅचवर्कचे काम तात्काळ करण्यात यावे. गणेश विसर्जनापुर्वी गणेश विर्सजन मार्गावरील खड्डयांचे पॅचवर्क करण्यात यावे.

**श्रीमती प्राजक्ता राजपुत** :शिलाई मशिनचा विषय वारंवार चर्चीला जात आहे. परंतु शिलाई मशिनचे वाटप केव्हा करणार आहे.

**महिला बाल कल्याण अधिकारी** :मशिन वाटपासाठी रेडी आहे. आयएसआय मशिनचीच मागणी सर्व स.पदाधिकारी आणि सदस्यांकडुन होत आहे.

**श्री.रेणुकादास वैद्य** :स.सदस्यांचा आग्रह नाही. टेंडरमध्ये तसे नमुद केलेले आहे.

**मा.सभापती** :नियमाप्रमाणे सप्लाय झालेला आहे का? प्रशासनाने अहवाल सादर करावा.

**महिला बाल कल्याण अधिकारी** :ज्या वेळेस निवीदा काढण्यात आली त्यावेळेस निवीदेमध्ये आयएसआयचा उल्लेख होता. कार्यादेश देण्यापुर्वी आयुक्तांकडुन आरसीची प्रत प्राप्त झाली. त्यामुळे ऑर्डर देण्याशिवाय प्रशासनाकडे कुठला पर्याय नव्हता. डिस्ट्रीप्शन ऑफ गुडस् दिलेले आहे ते आयएसआय 15449 हे As Per ISI आहे.

**मा.सभापती** :सर्व माहीती लेखी देण्यात यावी.

**श्री.विजेंद्र जाधव** :आयएसआयची मागणी केलेली आहे. त्यानुसार सप्लाय केला पाहीजे.

**मा.सभापती** :ॲक्शन पॉईन्ट क्रमांक 3 खुलासा करण्यात यावे.

**श्री.गिरजाराम हाळनोर** :पेव्हर ब्लॉकचे काम सुरू झाले नाही.

**कार्य.अभियंता (बिओटी)** :काम सुरू करण्यात आलेले आहे.

**श्री.समीर राजुरकर** :दोन दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येणार म्हणुन वर्तमानपत्रामध्ये बातमी देण्यात आलेली आहे. कुठल्याही पदाधिकारी यांना विश्वासात न घेता बातमी देण्यात आली आहे.

**मा.सभापती** :याबाबतीत प्रशासनाने पदाधिकारी यांचेशी चर्चा करून निर्णय घ्यावा. शिवाजी नगर कंम्पाऊंड वॉल बाबतीत खुलासा करण्यात यावा.

**कार्य.अभियंता (बिओटी)** : कंम्पाऊंड वॉल व विद्युत बाबत चर्चा झालेली आहे. काम लवकरात लवकर करण्यात येईल. येत्या 10 दिवसात कामाला सुरूवात होईल.

**कार्यकारी अभियंता (पा.पू.)** :अधिकृतरीत्या अशी कोणतीही बातमी देण्यात आलेली नाही. दोन दिवसाआड पाणीपुरवठा करण्याची वेळ येणार आहे त्यावेळी मा.पदाधिकारी यांना विश्वासात घेवुन निर्णय घेण्यात येईल.

**<u>विषय क्र. 50 :</u>** (विषय क्र. 46 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 07/09/2012 रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)

दिनांक 21/02/2011 (का.प.क्र.12), 14/03/2011 (का.प.क्र.13), 21/03/2011 (का.प.क्र.14), 22/03/2011 (का.प.क्र.15), 13/04/2011 व 15/04/2011 (दि.13/04/2011 ची तहकुब सभा) (का.प.क्र.16) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.

टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)

**मा.सभापती : विषय क्रमांक 50 स्थगीत.**

**ठराव :**

**प्रस्तुत प्रस्ताव स्थगीत ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.**

**विषय क्र. 51 :**

**प्रस्ताव सादर करण्यात येतो की, गांधीपुतळा ते मंजुरपुरा चौक ते छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय (व्हि.आय.पी.रोड) पर्यंत विकास योजनेनुसार रूंद करावयाच्या रस्त्यावर दोन्ही बाजुस मलनि:सारण वाहिन्या टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधीकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ चे सन 2011-12 चे डी.एस.आर. चे दर विचारात घेऊन तयार करण्यात आले असून अंदाजपत्रक रक्कम रू.39,69,426/- चे आहे. या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रं.721, दिनांक 20/04/2012 अन्वये मंजुरी प्राप्त आहे. मंजुरीनुसार कामाच्या निविदा बोलविण्यात आल्या असता मे.बिल्डवेल कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रक दरापेक्षा 10.10% जास्त दराची निविदा प्राप्त आहे. 10.10% जास्त दर स्विकारणेसाठी मा.आयुक्त महोदय यांची मंजुरी आहे.**

**मे.बिल्डवेल कन्स्ट्रक्शन यांची 10.10% जास्त दराची निविदा मंजुरीचा प्रस्ताव मान्यतेच्या विचारार्थ सादर.**

**मा.सभापती : विषय क्रमांक 51 मंजूर.**

**श्री.समीर राजुरकर :10.10 टक्के above निवीदा आलेली आहे त्याची तपासणी करण्यात आलेली आहे का?**

**शहर अभियंता :तपासणी करून घेतले आहे.**

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गांधीपुतळा ते मंजुरपुरा चौक ते छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय (व्हि.आय.पी.रोड) पर्यंत विकास योजनेनुसार रूंद करावयाच्या रस्त्यावर दोन्ही बाजुस मलनि:सारण वाहिन्या टाकणेच्या कामासाठी प्राप्त झालेली अं.प.दरापेक्षा 10.10 % जास्त दराची मे.बिल्डवेल कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**ऐनवेळचे विषय**

**विषय क्र. 52 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रशासकीय विभागासाठी शहरातील नेमुन दिलेले कामे (विविध प्रकारचे अतिक्रमण) करण्यासाठी बोलोरो जीपची अत्यंत आवश्यकता आहे.

- महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेचे एकुण सहा प्रभाग आहेत.
- सहा प्रभागामध्ये झालेले अतिक्रमण काढणे आवश्यक आहे.
- न्यायालयाच्या आदेशानुसार शहरातील राखीव ठेवण्यात आलेल्या पार्किगच्या जागा मोकळया करणे आवश्यक आहे.
- शहरातील अनधिकृत धार्मिक स्थळे काढणे.
- शहर विकास आराखडानुसार रस्ते रुंदीकरण करणे.
- व्यवसायिक इमारतीसाठी सोडण्यात आलेल्या पार्किंगच्या जागा मोकळया करणे.
- अनधिकृत मोबाईल टॉवर काढणे.

- शहराच्या आसपास हरितपटटात करण्यात आलेल्या २० बाय ३० चे प्लॉटवरील अतिक्रमण काढणे.
- खामनदीच्या पात्रातील अनधिकृत करण्यात आलेली कामे निष्कासित करणे.

अशा प्रकारचे कामे प्रशासकीय विभागातर्फे करणे चालु आहे. त्यासाठी अधिकारी व कर्मचारी यांना शहरात काम करण्यासाठी बोलोरो जीपची आवश्यकता आहे.

**प्रशासकीय विभागातर्फे करण्यात आलेली कामे खालीलप्रमाणे आहेत.**

**1) शहराच्या हद्दीतील नाविकास क्षेत्रातील 20X30 या आकारातील अनधिकृत प्लॉटीग निष्काषित केल्याबाबत :- औरंगाबाद शहराच्या हद्दीतील अंतर्गत नाविकास प्रशासकीय विभागातर्फे दिनांक 21/12/2011 ते 28/12/2011 याकाळात महानगरपालिका हद्दीतील नाविकास क्षेत्रातील 20X30 च्या आकारातील अनधिकृत रेखांकनावर कार्यवाही करण्याची मोहिम हाती घेण्यात आली असून या कार्यवाही अंतर्गत शहरातील विविध भागातील अनधिकृत रेखाकनावर कार्यवाही करण्यात आली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

| अ क्र | दिनांक | मौजे | गट क्र. | क्षेत्रफळ | निष्कासीत केलेल्या भुखंडाची संख्या | गुन्हे नोंदविलेल्या व्यक्तिची संख्या | गुन्हे दाखल क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 21/12/2011 | मिटमिटा | 32 व 33 | 6 एकर | 240 | 20 | एम.आर.टी.पी 1966 चे कलम 52, 43, भा.द.वि. 34 |
| 2. | 22/12/2011 | चिकलठाणा | 272, 290, 293 | 25 एकर | 1000 | 29 | एम.आर.टी.पी 1966 चे कलम 52, 43, |
| 3. | 22/12/2011 | नारेगाव | 13,14,15 व 16 | 30 एकर | 1200 | 29 | एम.आर.टी.पी 1966 चे कलम 52, 43, |
| 4. | 23/12/2011 | हर्सुल | 89,90,91 , 140, 145, 141, 299 | 36 एकर | 1440 | 07 | एम.आर.टी.पी 1966 चे कलम 52, 43, |
| 5. | 24/12/2011 | मुंकुदवाडी, राजानगर | 24/1, 53, 66 | 12 एकर | 480 | 21 | एम.आर.टी.पी 1966 चे कलम 52, 53 व 54, 43 आय.पी.सी 143, 147, 148,149, 332, 353, 336,427, |
| 6. | 23/12/2011 | भावसिंगपुरा | 62/1 | 2 एकर | 80 | -- | --- |
| 7. | 26/12/2011 | हर्सुल परिसर | 76,80,81 व 88,85/4 85/1 | 22 एकर | 880 | 04 | एम.आर.टी.पी 1966 चे कलम 52, 53 व 54, 43. |
| 8. | 27/12/2011 | जटवाडा रोड | 245, 246, | 31 एकर | 1240 | 46 | एम.आर.टी.पी 1966 चे कलम |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भिम टेकडी | 247, 248 | | | | 52, 53 व 54, 43. |
| 9. | 28/12/2011 | जटवाडा रोड | 247 | 6 एकर | 240 | -- | एम.आर.टी.पी 1966 चे कलम 52, 53 व 54, 43 |
| एकुण 7 दिवस | | | | 170 एकर | 6800 | 156 | |

बांधकाम परवानगी तपासणी/धोकादायक बांधकामाची पाहणी करुन कारवाई करणे तसेच बिट मार्शल मार्फत आलेल्या बांधकामाच्या यादीस पडताळणी करुन म.प्रा.व.न.र अधिनियम 1966 कलम 52, 53 व 54 नूसार कारवाई केली जाते. मुंबई प्रातिंक अधिनियम 1949 कलम 260, 478 अन्वये पुढील कारवाई प्रस्तावित करणे इ.कामे सोपविण्यात आलेले आहे.

02) मनपा मालकीच्या खुल्या जागा :- महानगरपालिकेच्या मंजुर रेखाकंनातील एकुण 11 खुल्या जागेवरील अतिक्रमणे/ अनाधिकृत बांधकामे काढण्यात येऊन कोटयावधी रुपयाची मनपा मालकीची जमीन अतिक्रमणमुक्त करण्यात आली.

03) मोबाईल टॉवर - शहरातील अनाधिकृत मोबाईल टॉवर विरुध्द (सील करण्याची) मोठया प्रमाणावर कारवाई करण्यात आल्यानंतर 167 मोबाईल टॉवर वरुन 355 मोबाईल टॉवर महानगरपालिकेच्या रेकार्डवर आले. त्यानंतर मोबाईल टॉवरच्या मिळकतीवर मालमत्ता कराची आकारणी करण्यात येऊन सुमारे 4 कोटी पर्यत वार्षिक महसूलाची वाढ करण्यात आलेली आहे.

04) अनाधिकृत धार्मिक स्थळे - महानगरपालिका क्षेत्राअंतर्गत सर्वोच्च न्यायालयाच्या अपील क्र. 8519/2006 व उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्र. 3865/2008 मध्ये दिलेल्या निर्देशानूसार व शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशानूसार अनाधिकृत 506 धार्मिक स्थळाची यादी तयार करण्यात आली. त्यामधून रस्त्यामधील पुर्णत:/ अंशता बाधीत एकुण 27 धार्मिक स्थळे (ज्यामध्ये 16 मंदीर, 10 दर्गा, 1 बौध्दविहार) दि. 25/11/2010 पर्यत निष्काषित करण्यात आली.

05) पार्किग :- बांधकाम परवानगी घेतल्यानंतर मंजुर बांधकाम परवानगी नकाशातील पार्किग क्षेत्रामध्ये केलेल्या अनाधिकृत बांधकाम विरुध्द केलेल्या कारवाईमध्ये एकुण 153 प्रकरणा पैकी 90 प्रकरणामध्ये कारवाई करण्यात येऊन पार्किगच्या जागा ज्यामध्ये हॉटेल, हॉस्पीटल, गॅरेज, वर्कशॉप, शॉप व इतर अनाधिकृत बांधकामे पाडण्यात येऊन पार्किगच्या जागा खुल्या करण्यात आलेल्या आहेत.

06) खाम नदीतील 119 अतिक्रमणे निष्काषित करण्यात आले - मान्सनपुर्व आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत खाम नदीतील अनाधिकृत अतिक्रमणे तपासणी अंती नदी, नाल्याला पुर येऊन जिवीत व वित्त हानी होऊ नये म्हणुन अतिक्रमणे काढण्याची मोहिम दि. 19/05/2011 पासून ते दि. 26/5/2011 रोजी मोहल्ला हिलाल कॉलनी, आरेफ कॉलनी, जहागीर कॉलनी, एकता कॉलनी, जटवाडा रोड येथील खाम नदी पात्रातील नगररचना विभागाने 30 मीटर मार्कीग केल्याप्रमाणे 119 अतिक्रमण काढण्यात आलेले आहेत. त्यानूसार शासनाची जागा विकल्या व विकसीत केल्यामुळे भा.द.वि. कलम 420, 468, 415, 418, 427, 441, 434, 431, 430, 120 ब सह एम.आर.टी.पी. 1966 चे कलम 52, 53 अन्वये 471 सह भा.द.वि. 447, 448, 464, 465, 468 व 470 कलमान्वये गुन्हा रजी. क्र. I/88/11 दि. 23/06/2011 नुसार गुन्हे दाखल केले आहेत.

07) रस्त्या रुंध्दीकरण मोहिम - रस्त्या रुध्दीकरणामध्ये बाधीत बांधकामे ज्यामध्ये बाबा पेट्रोल ते क्रांतीचौक, औरंगपुरा ते गुलमंडी, उस्मानपुरा ते संत एकनाथ रंग मंदीर, मिलकॉर्नर ते एस.टी. बसस्टॅन्ड या रस्त्यामधील 192 अतिक्रमणे काढण्यात आली.

08) उपरोक्त कामासाठी प्रशासकीय विभागाला एक बोलोरो SLX-7 शिट वाहनाची आवश्यकता आहे. रत्नप्रभा मोटार्स, औरंगाबाद यांच्या कोटेशननुसार महिद्रा ॲण्ड महिद्रा कंपनीचे बोलोरो SLX-7 शिट या वाहनासाठी रुपये 7,62,602 /- (अक्षरी सात लाख बासष्ट हजार सहाशे दोन रुपये फक्त) खर्च येणार आहे.

| **Model No** | बोलोरो SLX-7 शिट |
|---|---|
| Showroom Price | Rs. 06,71,000/- |
| Insurance Charges | Rs. 27,062/- |
| R.T.O. Registration Charges & Road Tax | Rs. 51,120/- |
| LBT (2 %) | Rs. 13,420/- |
| **Total** | **Rs. 07,62,602/-** |

वर नमुद तपशीलानुसार रत्नप्रभा मोटार्स, औरंगाबाद यांच्याकडुन बोलोरो SLX-7 शिट हे वाहन खरेदी व लागणाऱ्या खर्चाचा प्रस्ताव शिफारसीसह मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती :विषय क्रमांक 52

श्री.नारायण कुचे :यांत्रिकी विभागात एकुण किती वाहने आहेत. वाहनांबाबत संपूर्ण माहिती घेण्यात यावी. सदरील वाहने कुणाला द्यायची आहे.

उपआयुक्त (सिडको) :फिल्डवर जाण्याकरीता प्रशासकीय विभागाकडे वाहन नाही. प्रशासकीय विभागाला वाहनांची आवश्यकता आहे. प्रशासकीय विभागाने चांगली वसुली केलेली आहे. 69 लाख रूपये मोबाईल टॉवरच्या माध्यमातुन वसुल केलेले आहे.

मा.सभापती :बुलेरो गाडीची आवश्यकता आहे. विषय मंजूर करण्यात येतो.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रशासकीय विभागाला एक बोलोरो SLX-7 शिट वाहनाची आवश्यकता असल्यामूळे, रत्नप्रभा मोटार्स, औरंगाबाद यांच्या कोटेशननुसार महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीचे बोलोरो SLX-7 शिट हे वाहन खरेदी करणेसाठी लागणाऱ्या र. रु.7,62,602 /- (अक्षरी सात लाख बासष्ट हजार सहाशे दोन रुपये फक्त) च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र. 53 :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी यांच्यातर्फे प्रतिवर्षी गणेशोत्सव, शिवजयंती तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव साजरे करण्यात येतात. दिनांक 31.3.2006 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचा ठराव क्र.331 नुसार उत्सव साजरे करण्यासाठी प्रतिवर्षी गणेशोत्सवास रू.25000/- आणि शिवजयंती व डॉ.आंबेडकर जयंतीच्या प्रत्येक उत्सवास रू.10000/- रक्कम मनपा फंडातून उपलब्ध करून देण्यात येते.

तथापी सद्य:स्थितीत वाढलेली महागाई विचारात घेता प्रतिवर्षी गणेशोत्सवास रू.50000/- आणि शिवजयंती व डॉ.आंबेडकर जयंतीच्या प्रत्येक उत्सवास रू.20000/- रक्कम मनपा फंडातून उपलब्ध करून देण्यात यावी. करीता प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.समीर राजुरकर अनुमोदक : श्री.रेणुकादास वैद्य

मा.सभापती : कर्मचारी महासंघाचा विषय आहे. दरवर्षी गणेश उत्सवास 25 हजार रूपये देण्यात येतात. शिव जयंती व आंबेडकर जयंतीस 10 हजार

**रूपये देण्यात येतात. रक्कमेत वाढ करून देण्यात यावी अशी मागणी आहे. गणेश उत्सवास 50 हजार रूपये व शिवजयंती व आंबेडकर जयंतीस 20 हजार रूपये देण्यास मंजूरी देण्यात येते. विषय क्रमांक 53 मंजूर.**

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका अधिकारी / कर्मचारी यांचेतर्फे प्रतिवर्षी गणेशोत्सव, शिवजयंती तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव साजरा करण्यासाठी प्रतिवर्षी गणेशोत्सवास रू.50,000/- आणि शिवजयंती व डॉ.आंबेडकर जयंतीच्या प्रत्येक उत्सवास रू.20,000/- रक्कम मनपा फंडातुन उपलब्ध करून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर मा.सभापती यांनी राष्ट्रगिताने सभा संपन्न झाल्याचे घोषित केले.

नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद